# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. २६/१०/२०२१**

आज मंगळवार दि. २६/१०/२०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा दुपारी २.३० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. २१/१०/२०२१ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | जैन दिनेश तेजराज | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ९) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| १०) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ११) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १२) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १४) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १५) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १६) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १७) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १८) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १९) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| २०) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| २१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २२) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २५) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २६) | जैन गीता भरत | सदस्या. |
| २७) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २८) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २९) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| ३०) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ३१) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३२) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३३) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३४) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३५) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३६) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३७) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३९) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४०) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४१) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४२) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४३) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ४४) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४५) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४६) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४७) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ४८) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४९) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५०) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५१) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५२) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५३) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५४) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५५) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५६) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५७) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५८) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५९) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६०) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६१) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६२) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६५) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६६) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६७) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६८) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६९) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ७०) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७१) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७२) | अहमद साराह अकरम | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७५) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७६) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ७७) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ७८) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ७९) | शर्मा भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | ॲड शफीक अहमद सादत खान | नामनिर्देशित सदस्य |
| ८१) | भोसले अनिल बाबुराव | नामनिर्देशित सदस्य |
| ८२) | अजित भगवान पाटील | नामनिर्देशित सदस्य |

<u>गैरहजर सदस्य -</u>

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| २) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| ३) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ४) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ५) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ६) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ७) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ८) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ९) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| १०) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ११) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| १२) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| १३) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| १४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| १५) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |
| १६) | सिंह विक्रमप्रताप रमाप्रती | नामनिर्देशित सदस्य |

रजेचा अर्ज - निरंक

मा. महापौर:-

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सूरूवात करावी.

नगरसचिव:-

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा मंगळवार दि.२६/१०/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. प्रकरण क्र. 57, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सनानिमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

प्रशांत दळवी:-

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त दरवर्षीप्रमाणे सानुग्रह अनुदान देत आहे.

महानगरपालिका आस्थापनेवर दि.31/03/2021 पर्यंत कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्ग यांना मागील सन-2020 मध्ये मंजूर झालेल्या अनुदान रक्कमे प्रमाणे यावर्षीही खालीलप्रमाणे अनुदान देण्यात यावे.

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी / कर्मचारी</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/ कर्मचारी | सन 2020-21 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-01 ते वर्ग-04 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1428 | 22,470/- | 3,20,87,160/- |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 67 | 17,302/- | 11,59,234/- |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 03 | 9,887/- | 29,661/- |
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 107 | 9,269/- | 9,91,783/- |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 115 | 3,531/- | 4,06,065/- |
| 6. | वैद्यकीय आरोग्य विभागातील ठोक मानधनावरील अधिकारी/कर्मचारी | 63 | 14,212/- | 8,95,356/- |
| 7. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 05 | 9,887/- | 49,435/- |
| 8. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 8,539/- | 42,695/- |
| 9. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 9,887/- | 19,774/- |
| 10. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 6,179/- | 37,074/- |
| 11. | क्षयरोग कर्मचारी | 22 | 14,212/- | 3,12,664/- |
| | **एकुण** | **1823** | | **3,60,30,901/-** |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2020-21 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 167 | 19,774/- | 33,02,258/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी/शालेय पोषण आहार अंतर्गत कर्मचारी | 21 | 17,302/- | 3,63,342/- |
| | **एकुण** | **188** | | **36,65,600/-** |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेसाठी **3,60,30,901/-** (अक्षरी रु. तीन कोटी साठ लाख तीस हजार नऊशे एक मात्र) खर्च अपेक्षित आहे. या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.3.75 कोटी इतकी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. 36,65,600/- (अक्षरी रु. छत्तीस लाख पासष्ट हजार सहाशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु.40.00 लक्ष इतकी तरतुद आहे.

तरी महानगरपालिका अधिकारी/ कर्मचाऱ्यांना व शिक्षक वर्गासह कर्मचाऱ्यांना उपरोक्त तक्त्यात नमुद सानुग्रह अनुदान देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

तसेच कोविड-19 साथरोगाशी सामना करताना महानगरपालिकेस सुमारे 125 कोटी चा खर्च होवून शासनाकडून फक्त 19 कोटी अनुदान प्राप्त झाल्याने मनपाची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. दर महिन्यास सुमारे 35 कोटी अनिवार्य खर्च होत असल्याने महानगरपालिकेकडे निधी नसल्याने मोठ्या स्वरुपात देयके थकली आहेत. त्याचप्रमाणे कंत्राटदार यांना केलेल्या कामांची देयके प्रदान करणे आवश्यक आहे. यातुन आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मनपाकडे असलेल्या 122 कोटी रक्कमेच्या राखीव ठेवीच्या बदल्यात ओव्हर ड्राफ्ट घेतल्यास महापालिकेची थकीत विकास कामे सुरु होतील व अत्यावश्यक खर्च सुरळीत अदा करुन प्रलंबित देयके सुध्दा टप्प्याटप्प्याने देता येतील. शासनाकडून अनुदान व थकीत रक्कम प्राप्त झाल्यास टप्प्याटप्प्याने ओव्हरड्राफ्ट पध्दतीने घेतलेल्या रक्कमेत ती रक्कम वर्ग करण्यात यावी.

तरी मनपाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना व प्रक्रिया पाडण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच महापालिकेच्या काही कर्मचाऱ्यांनी कोविड कालावधीत चांगले काम केले आहे व राज्यपाल मा. श्री. भगतसिंग कोशियारी यांनी मा. आयुक्त - श्री. दिलीप ढोले यांचा सत्कारही केलेला असुन महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता देणे आवश्यक आहे. तरी मा. आयुक्तांनी इतर महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांना दिलेल्या कोविड भत्त्याची माहिती घेवून मा. महापौर व महापालिकेचे पदाधिकारी, गटनेते यांना विश्वासात घेवून महापालिका कर्मचाऱ्यांना 1 महिन्यांच्या आत कोविड भत्ता देण्यासही सभा मान्यता देत आहे.

डिंपल मेहता:-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार:-

मा. महापौर सानुग्रह अनुदानाचा गोषवारा असताना आर्थिक बाबी पालिकेच्या आतमध्ये कशी घूसवाघूसवी करता. सत्ताधारी म्हणून तूम्हालाच विचारतो. हा विषय सानुग्ह अनूदानाच्या असलेल्या तरतूदीमधून आपल्याला सानूग्रह खरतर शासनाने सर्वच बंदकरून ठेवलेले आहे. तरी आपण त्यांना देतो त्यांची दिवाळी झाली पाहिजे मनामध्ये तशी भावना ठेवून आपण तसे काम करतो महापौर मॅडम ह्याचयामध्ये आपण ओडी घ्या ओडी हा विषय प्रशासनाच्या माध्यमातून आला पाहिजे आयुक्त महोदय माझी आपणास विनंती आहे असे आलेले ठराव असेल आलेले ठराव ह्याला तूम्ही अजिबात जूमानू नका त्याला बाजूला ठेवा आपल्या गोषवा-याचा जो मजकूर आहे तोच घ्या अशा प्रकारे कूठल्याही ठरावामध्ये आतमध्ये घूसवायचे आणि त्याच्यामध्ये मिळवायचे हे बरोबर नाही. हा आर्थिक

बाबीचा विषय आहे तो प्रशासनाच्या माध्यमातूनच आला पाहिजे आपल्याला गरज आहे आपल्याला त्यातून काही मार्ग काढता येत असेल तर माझी सभागृहाला विशेषत: प्रशासनाला सूचना आहे प्रशासनाच्या बाजूने अशा प्रकारचे ठराव येवू द्या त्यानंतर त्यावर निर्णय घेतला जाईल. महापौर मॅडम सानुग्रह अनुदानाबद्दल आमचा आक्षेप नाही. बाकीच्या विषयावर आमचा आक्षेप आहे ह्याची आपण कृपया नोंद घ्यावी.

प्रशांत दळवी:-

मा. महापौर मॅडम मी पहिलेच क्लियर केले आहे आपण ही मंजूरी घेत असतांना ह्या ठरावामध्ये विस्तृतपणे नमूद केलेले आहेत की ह्या कोविड काळामध्ये आपला झालेला खर्च आणि मनपाचा झालेला खर्च आणि जर आम्ही कूठून कर्ज घेत असू परंतू आमचे हे म्हणणे आहे आमचे शासनाकडून येण प्रलंबित आहे. आज आपण बाळासाहेब ठाकरे मैदानावर जे सेंटर उभारले होते त्याच्यामध्ये 12 करोड पैकी आपली मनपाची अर्धी रक्कम गेली आहे मनपानी खर्च केला आहे त्यामूळे इतरही खर्च मनपानी केलेले आताही होत असलेला खर्च हे सगळे लक्षात घेता आमचे असे म्हणणे आहे की शासनाकडून जेव्हा पैसा येईल त्यावेळी आम्ही तो तिकडे वर्ग करू आणि ती रक्कम तिथे भरू म्हणजे शासन पैसे देणार नाही असे आपले म्हणणे आहे का ? आयुक्त महोदयाचे शासनाकडून घेण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. त्याही वेळेला मी चर्चा केली होती तेव्हा तत्कालीन आयुक्तांनी हे नमूद केले आहे की जी रक्कम मनपाची खर्च झाली आहे ती शासनाकडून निधी आल्यावर ती पहिली मनपामध्ये वर्ग करण्यात येईल त्यामूळे आपण ह्याच्यात वायफळ खर्च आपण दाखवला नाही किंवा करतही नाही आणि सानुग्रह अनुदान आजच देतो असे नाही आपण दरवर्षी कर्मचा-यांना देतो मग बाकीच्या विषयावर आक्षेप घ्यायचे तसेच आक्षेप इथे घेतले ना महापौर मॅडम तुम्ही शासनामध्ये बसले आहेत ना ह्याचा पाठपूरावा करावा 125 कोटी पैकी 19 कोटी इथे प्राप्त झाले आहेत बाकी पैसे मनपानी भरले ना ते प्रशासनानी ठिकाणी क्लियर करावे की मनपाचा किती ख्र्च झाला आहे.

जुबेर इनामदार:-

हा विषय ह्यासाठी घेतला की तो विषय प्रशासनाच्या माध्यमातून आला नव्हता.

प्रशांत दळवी:-

ठीक आहे जुबेर साहेब ॲग्री करतो. आपण हा विषय अशा प्रकारे घेतला तर त्यामध्ये काय प्रॉब्लेम काय आहे.

जुबेर इनामदार:-

कारण् हा विषय आर्थिक बाबीचा आहे धोरणात्मक निर्णय आहे. आणि तो धोरणात्मक निर्णय प्रशासनाच्या माध्यमातून आला पाहिजे होता समजा आयुक्तांनी आताही निवेदन दिले आयुक्तांच्या शुध्दमुखी तो निवेदनाच्या माध्यमातून सभागृहात ठेवला तर आपण त्याचा विचार करू.

प्रशांत दळवी:-

जुबेर साहेब आपण बोलता बरोबर आहे परंतू धोरणात्मक निर्णय महासभेसमोरच होतो ना आपण महापौराबरोबर वेगळी बैठक घेतली नाही. त्यामूळे धोरणात्मक निर्णयसाठी विषय आलेला आहे.

जुबेर इनामदार:-

तुम्ही उठून उभा राहिला तुम्हाला काय भास होतो का की अशाप्रकारे आपल्याला विषय करायचे आहेत.

प्रशांत दळवी:-

तुम्ही जसे म्हणालात की धोरणात्मक निर्णय आहे तर आता महासभाच चालू आहे महासभेपूढेच चालू आहे.

जुबेर इनामदार:-

आर्थिक बाबीची तशी गरज असेल तर आयुक्त तसे निवेदन करतील.

प्रशांत दळवी:-

आयुक्त निवेदन करतील.

जुबेर इनामदार:-

मग विषय संपला.

निलम ढवण:-

सानुग्रह द्या तुम्ही त्यासाठी आमचा विरोध नाही.

अनिल सावंत:-

मा. महापौर मॅडम सानुग्रह अनूदानाचा जो विषय आहे एफ.डी गाहन ठेवून ओडी घ्यायचा हा विषय वगळून प्रशांत दळवी सभागृह नेते ह्यांनी जो विषय मांडला आहे त्याला आमचे पूर्ण समर्थन आहे. आणि सानुग्रह अनुदान दिलाच पाहिजे. माझी आयुक्त आणि महापौरांना विनंती आहे मनपा शाळेतील जे प्राथमिक शिक्षक आहेत आणि मनपातील कर्मचा-यामध्ये दूजाभाव करत आलो आहोत. गेल्या पाच वर्षामध्ये एक ते चार वर्गातील कर्मचारी ह्यांना देण्यात येणारे कर्मचारी आणि प्राथमिक शिक्षक आहेत त्यांना देण्यात येणार अनुदान हे एकच होते परंतू गेल्या 5-6 वर्षामध्ये त्याच्यात तफावत आहे त्यांना अनुदान कमी देण्यात येते तर माझी आपणास विनंती आहे की इतर कम्रचा-याना जे अनुदान दिले आहे त्याप्रमाणे प्राथमिक शिक्षकांना ते अनुदान देण्यात यावे. कोविडच्या काळामध्ये वैदयकिय आरोग्य विभागाने ठोक मानधनावर काही नर्सिंग स्टाफ मनपातर्फे अपोइंट केला त्यांनी टेंभा हॉस्पीटल आणि इतर कोविड सेंटरमध्ये आपली सेवा दिली आहे.  त्यांनी 6-7 महिनो काम केले आहे तर त्यांना सुध्दा हे सानूग्रह अनूदान देण्यात यावा त्याची दिवाळी गोड जाईल. कितीही द्या त्यामूळे शहरात चांगला मेसेज जाईल.5-6 महिन्यापूर्वी महासभेने एक ठराव केला होता मिरा भाईदर शाळेतील शिक्षकांना सातवा वेतन देण्यासाठी परंतू आजूनही त्या ठरावाची अमंलबजावणी झाली नाही. माझी आपणाला विनंती आहे ह्या विषयासाठी आपल्या दालनामध्ये मिटींग घेवून सातवे वेतन लवकरात लवकर देण्यात यावे. महापौर मॅडम आपल्या दालनामध्ये एक मिटींग झाली होती 14 शिक्षक उशिरा जॉईन्ट झाले आणि त्यांनी ती कोविडची डयूटी केली शहरामध्ये इलेक्शनचे काम किंवा जनगणना असेल तर प्राथमिक शिक्षकांना कामाला लावतो. शाळा आणि ते काम प्राथमिक शिक्षक करत असतात. आणि ते 14 शिक्षक जे उशिरा जॉईन्ट झाले आणि त्यांनी कोविडची डयूटी केली त्यांचे दोन वर्षाचे इन्क्रीमेंट प्रशासनानी थांबवलेले आहे दोन महिन्याचा पगार थांबवलेला आहे आपल्या दालनात त्याविषय मिटींग घेतलेली होती आपण निर्देश दिले होते डीएमसी नी त्यावेळी सांगितले होते की ह्यावर लवकरात लवकर निर्णय घेवू अजूनही त्याच्यावर निर्णय झाला नाही. त्या 14 शिक्षकांचा जो विषय आहे त्याचा निर्णय लवकरात लवकर देण्यात यावे. तसेच मनपाचे जे कर्मचारी उशिरा जॉईन्ट झाले त्यांच्याबाबत हा दूजाभाव केला नाही प्राथमिक शिक्षक मेडीकल ग्राऊड असेल किंवा इतर काही कारण असेल त्यासाठी उशिरा जॉईन्ट झाले आणि त्यांनी ही डयूटी केली त्याच्याबाबत हा दूजाभाव केलेला आहे ह्या सर्व बाबीचा आपण महापौर मॅडम आपण शिक्षिका आहात आयुक्त साहेब आपणाला सुध्दा विनंती आहे ह्या सर्व गोष्टींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सभागृनेत्यांना माझी विनंती आहे की प्राथमिक शिक्षकांच्या सानूग्रह अनुदानामध्ये जी तफावत आहे ती करावी अशी सुचना ठरावात घ्यावी अशी माझी विनंती आहे.

निलम ढवण:-

मा. महापौर मॅडम सर्वच विभागात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याविषयी चर्चा झाली जे ठेका पध्दतीने बरेच कर्मचारी ब-याच विभागात कार्यरत आहेत तर ते ही आपल्या मनपाचे कामच करत असतात आणि इतर कर्मचा-याप्रमाणे काम करतात तर माझी मा.

महापौर आणि मा. आयुक्तांना विनंती आहे की आपण ठेकेदारांना ह्या गोष्टीची कल्पना देवून त्या कर्मचा-यांना काहीन काही सानूग्रह अनूदान देण्यात यावी अशी आपणास विनंती करते.

धृवकिशोर पाटीलः-

महापौर मॅडम अनिल सावंत आणि जुबेर इनामदार ह्यांनी जे सांगितले आहे की प्रशांत दळवीजीनी जो ठराव मांडला आहे त्याच्यामध्ये असे म्हटले आहे की विकास कामे जे ठेकेदार करतात मिरा भाईदरची विकास काम सूरू आहेत त्या ठेकेदारांना त्या निविदाधारकांना पेमेंट अदा केले जात नाही सर्व विकासकाम जवळजवळ थांबलेली आहेत ह्या शहराचा विकास थोडा थांबलेला आहे मनपानी कोविडमध्ये 125 ते 150 कोटी खर्च केला आहे शासनाकडून जे पैसे आले आहे ते तूटपुंज पैसे आले आहेत त्यामुळे मनपाला खर्च करण्यासाठी पैसे नाहीत त्यामूहे प्रशांतजीने जो ठराव केला आहे त्याच्यामध्ये असे म्हटले आहे की मनपाकडे ज्या राखीव ठेवी आहेत त्याच्यावर जर आपण ओवर ड्राफ्ट घेतला आणि ते पैसे आपल्या विकास कामांना लावले तर ह्या शहराच्या विकासाचा वेग वाढेल हा त्यांचा चांगला उद्देश होता. आपले कर्तव्य आहे की चांगले काम होत आणि ते थांबले आहे तर त्याच्या पैश्याची सोय करणे आपले आद्य कर्तव्य आहे. म्हणून प्रशांतजीने ते कर्तव्य पार पाडले आहे. ह्याच्यामध्ये चूकीचा कोणताही इंटरेस्ट प्रशांतजीचा नाही आहे कोविडमध्ये चांगले काम केले आहे म्हणून आयुक्त साहेबांचा राज्यपालांनी सत्कार केलेला आहे तरी आपले जे वर्कर आहेत त्यांना कोविडभत्ता इतर मनपामध्ये दिलेला आहे त्याप्रमाणे मिरा भाईदर मनपानी द्यावा हे दोन विषय त्याच्यामध्ये अॅड केले आहेत ह्याच्यामध्ये कोणतेही चूकीचे काम केलेले नाही. म्हणून माझी महापौरांना विनंती आहे की हा जो प्रशांतजीने ठराव मांडला आहे तो सर्वानी सर्वानुमते मंजूर करावा.

जुबेर इनामदारः-

सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील मी कूठेही ठरावाच्या विरोध करत नाही किंवा प्रशासनाने जी अडचण नमूद केली त्यालाही विरोध करत नाही विषय असा आहे तुमच्या ठेवी जर तुम्ही वापरल्या तर तुमचा व्याज जाईल. व्याज जो जातो त्यामुळे पालिकेचा रेव्हेन्यू लॉस आहे. माझे अजूनही तेच मत आहे आयुक्त् महोदयांनी असलेली भुमिका ती सांगावी म्हणजे कोणाचाही ह्या ठरावाला विरोध राहणार नाही. विषय संपून जाईल.

धृवकिशोर पाटीलः-

मा. महापौर मॅडम ही जर काम थांबली आणि जर काम गेली तर आपल्याला एक्स्टेशन द्यायला लागेल तो खर्च वाढतो.

दिनेश जैनः-

आपण जी एफ.डी ठेवलेली आहे त्याचे पण व्याज येतो ते आपण ओ डी ला व्याज दिले तर काही नुकसान नाही आहे. उलट आपली जी काम होणार आहेत त्याचा जो वाढीव खर्च आहे तो वाचणार आहे.

मा. आयुक्तः-

सन्मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, सभागृह नेते दळवी साहेबांनी आपले मत मांडले त्यानंतर जुबेर इनामदार, धृकिशोर पाटील ढवण मॅडमनी मत मांडले त्यानुसार हा प्रश्न उपस्थित झाला की आपल्या एफ.डी वर ओव्हर ड्राफ्ट कसा घ्यावा. आपल्याकडे सर्वसाधारण 122 कोटीच्या एफ डी आहेत आणि त्यामध्ये 5.30,5.40 च्या दर्म्यान आपल्या एफ डी वर व्याज येत असते आणि ओव्हर ड्राफ्ट घेतला तर वार्षिक अर्ध्या टक्क्याचा फरक पडतो. म्हणजे आपण दूस-या फायनशियल इन्सटयूटमधून कर्ज घेतले तर किमान ८-१०% व्याज असते परंतू आपल्या एफ डी ज्या बँकेत आहेत त्या बँकेत आपला नेहमी व्यव्हार सूरू असतो प्रॉपर्टी टॅक्स असेल टेंडरची बिल किंवा आस्थापनेचा खर्च असेल जे वेगवेगळया लेखाशिर्षाखाली ज्या बँकेत मनपाची देवाणघेवाण असते अशा बॅंकाकडून कायादयातूल कलम १०९,११० मध्ये तरतूद आहे ११० मध्ये असे म्हटले आहे १०९ मध्ये काही नमूद

असले तरी आयुक्तांना ते अधिकार आहेत आणि ज्यावेळेला आर्थिक परिस्थिती बेताची होती अडचणीची होती अशा वेळी कर्जरूपाीच्या माध्यमातून किंवा ओव्हर ड्राफ्टच्या कर्जरूपी तर आपल्या मनपाकडू येते तर असे ओव्हर ड्राफ्ट घेण्याची तरतूद आहे त्यानूसार आपला फक्त वार्षिक अर्धा टक्का फरक पडतो परंतू वेळेत बिल अदा केले नाही तर तर वर्षाला ८-१०% फटका बसतो. त्या तूलनेत अर्धा टक्का नाममात्र व्याजाचा फरक आहे वार्षिक अर्धा टक्का नाममात्र आहे त्यामूळे दोन गोष्टी होतील आजच्या तारखेला आपल्याला शासनाकडून एल बी टी च्या माध्यमातून १९.१० कोटी मिळतात सर्वसाधरण महिन्याला ३५ कोटी खर्च आहे ही तफावत आपण वेगवेगळया माध्यमातून मनपाचा जो महसूल आहे तो वढवण्याच्या दृष्टीकोनातून करत असतो. जवळपास ९५ ते १०० कोटीची जूनी बिल होती. परंतू ह्या वर्षी आजच्या वर्षाला प्रॉपर्टीचे ह्या दिनांकापर्यंत सुमारे ८५ कोटी जमा झालेले आहेत त्यामूळे १०० कोटीचा आकडा बिलाचा खर्च भागवत भागवत आपण तो ५० कोटीवर आणला आणि प्रशासन महसूलाचे उत्पन्नाची जी साधन आहेत त्याच्यावर जास्तीत जास्त जोर लावून आपले स्वत:चे उत्पनन वाढवण्याच्य दृष्टीने कसोशीने प्रयत्न करत आहे त्यामूळे आपल्याकडे स्पिल ओव्हर ही राहणार नाही आणि शहराची जी विकासाची काम थांबली आहेत ती थांबणार नाही ब-याच खाजगी कंत्राटदारांची आपण बिल देवू शकत नाही. उदा. साफसफाई जर आपण साफसफाईची बिल दिले नाही तर तो त्याच्या कर्मचा-याचा पगार देवू शकत नाही, वाहतूक करणा-या क्लिनर ड्रायव्हरचा पगार देवू शकत नाही, गार्डनमध्ये कर्मचारी आहेत थोडक्यात काय जे वेगवेगळया विभागात कंत्राटी स्वरूपात जे कर्मचारी काम करतात त्यांना जर कचरा काढण्याची बिल वेळेत दिली तर त्याचा पगार वेळेत करू शकतात नाहीतर आपल्याकडे काम करणार नियमीत कर्मचारी आहेत त्यांचा बोनस आणि पगार वेळेत दिला जाईल आणि जे कंत्राटी पध्दतीने काम करतात त्यांना तो मिळणार नाही अशी तफावत राहू नये. सणासूदीचे दिवस आहेत आणि ज्या कंत्ाटदाराची बिल आपण वेळेत अदा केली नाहीत. तर स्पिलओव्हर तर वाढतोच आणि मनपाचे नाव खराब होण्याची शक्यता असते. म्हणून कलम ११० नूसार जे आपल्याला अधिकार आहेत त्या अधिकारात राहून आपल्या सिक्यूरिटी डिपॉझिटवर वार्घिक अर्ध्या टक्क्याचा फरक पडतो असेही आपल्या एफ डी वर पाच ते साडेपाच टक्याचे व्याज आहे त्याच्यावर वाकिर्षक अर्ध्या टक्कयाचा फरक पडेल आणि शहरात जी विकासाची काम रोखलेली असतील आणि ब-याचा नगरसेवकाची प्रभागातील काम असतील थोडक्यात शहरातील सर्वच प्रकारच्या कामावर आणि प्रशासनाच्या इतर आस्थापनेवर विपरीत परिणाम होवू नये म्हणून मा. दळवी साहेबांनी जी सूचना मांडली आहे तसेच जुबेर साहेबांनी जे मुद्दे सुचविले आहेत आणि महासभा लागल्यावर आपल्याकडे वेळ कमी आहे आणि पून्हा दिवाळीचा सण तोंडावर आला आहे म्हणून प्रशासनाच्या मार्फत आयुक्त म्हणून माझी विनंती राहील ह्या सर्वपक्षीय सदस्यांनी पाठिंबा द्यावा. आणि जे प्रशासन कारवाई करेल ती वेळोवेळी काय कारवाई होईल ती मा. महापौर आणि गटनेत्यांना अवगत करण्यात येईल. धन्यवाद

जुबेर इनामदार:-

मा. महापौर मॅडम अनिल सावंतजीनी सानुग्रह अनुदानाची एक सुचना केली होती त्याचा त्या ठरावात समावेश करण्यात यावा. आणि सर्वानुमते हा ठराव मंजूर करण्यात यावा.

मा. महापौर:-

सन्मा सभागृह नेते प्रशांतजी दळवी ह्यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

निलम ढवण:-

सानुग्रह अनुदानाची सुचनेचे काय झाले. ठेकेदारामार्फत मूल आहे त्यांचे.

मा. उपमहापौर:-

सुचनाविषयी प्रशासनानी विचार करून त्याचे उत्तर द्यावे ही विनंती.

मा. महापौर:-

संबधीत नगरसेवकांनी ज्या सुचना मांडल्या आहेत त्याचा प्रशासनानी विचार करून अंमबजावणी करावी.

अनिल सावंत:-

महापौर माझ्या ज्या दोन सूचना आहेत त्या ठरावामध्ये इन्क्लूड झाल्या का नाहीतर आमचा ठराव आहे.

धृवकिशोर पाटील:-

प्राथमिक शाळा शिक्षण व सर्व शिक्षा अभियान हे ह्या ठरावात आहे.

प्रशांत दळवी:-

महापौर मॅडम आपण म्हटल्याप्रमाणे ह्या ठरावामध्ये काही सुचनांची अंमलबजावणी होणार नाही परंतू आपण जसे सांगितले महापौराचे असे म्हणणे आहे की आपण केलेली सुचना ती प्रशासनाचे अधिकारी आहेत आयुक्त त्यांनी अमलात आणावी.

निलम ढवण:-

मा. महापौर मॅडम सुचनेसहीत घ्यायला काय हरकत आहे. त्याच्यावर निर्णय ते घेतील. तीन महिन्याचा पगार मिळाला नाही त्यामूळे बोलायला लागते.

धृवकिशोर पाटील:-

आता जो ओव्हर ड्राफ्टचा विषय आला आहे तो मंजूर करा. जेणेकरून सर्व काम सूरळीत पार पडतील.

निलम ढवण :-

तो विषय आयुक्तांनी दिला तर आपण त्याला मान्यता दिली आहे.

मा. महापौर:-

सभागृह नेत्यांनी जो ठराव मांडला आहे. त्यामध्ये ज्या सन्मा. सदस्यांनी सुचना केल्या आहेत त्यावर प्रशासनाने अभ्यास करून सदर सुचनासहित ठरावाची अंमलबजावणी करावी.

प्रकरण क्र. 57 :-

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सनानिमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

ठराव क्र. 51 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त दरवर्षीप्रमाणे सानुग्रह अनुदान देत आहे.

महानगरपालिका आस्थापनेवर दि.31/03/2021 पर्यंत कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्ग यांना मागील सन-2020 मध्ये मंजूर झालेल्या अनुदान रक्कमे प्रमाणे यावर्षीही खालीलप्रमाणे अनुदान देण्यात यावे.

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी / कर्मचारी</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/ कर्मचारी | सन 2020-21 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 12. | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-01 ते वर्ग-04 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1428 | 22,470/- | 3,20,87,160/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13. | संगणक चालक/लघुलेखक | 67 | 17,302/- | 11,59,234/- |
| 14. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 03 | 9,887/- | 29,661/- |
| 15. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 107 | 9,269/- | 9,91,783/- |
| 16. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 115 | 3,531/- | 4,06,065/- |
| 17. | वैद्यकीय आरोग्य विभागातील ठोक मानधनावरील अधिकारी/कर्मचारी | 63 | 14,212/- | 8,95,356/- |
| 18. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 05 | 9,887/- | 49,435/- |
| 19. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 8,539/- | 42,695/- |
| 20. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 9,887/- | 19,774/- |
| 21. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 6,179/- | 37,074/- |
| 22. | क्षयरोग कर्मचारी | 22 | 14,212/- | 3,12,664/- |
| | **एकुण** | **1823** | | **3,60,30,901/-** |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2020-21 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 3. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 167 | 19,774/- | 33,02,258/- |
| 4. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी/शालेय पोषण आहार अंतर्गत कर्मचारी | 21 | 17,302/- | 3,63,342/- |
| | **एकुण** | **188** | | **36,65,600/-** |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेसाठी **3,60,30,901/-** (अक्षरी रु. तीन कोटी साठ लाख तीस हजार नऊशे एक मात्र) खर्च अपेक्षित आहे. या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.3.75 कोटी इतकी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. 36,65,600/- (अक्षरी रु. छत्तीस लाख पासष्ट हजार सहाशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु.40.00 लक्ष इतकी तरतुद आहे.

तरी महानगरपालिका अधिकारी/ कर्मचाऱ्यांना व शिक्षक वर्गासह कर्मचाऱ्यांना उपरोक्त तक्त्यात नमुद सानुग्रह अनुदान देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

तसेच कोविड-19 साथरोगाशी सामना करताना महानगरपालिकेस सुमारे 125 कोटी चा खर्च होवून शासनाकडून फक्त 19 कोटी अनुदान प्राप्त झाल्याने मनपाची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. दर महिन्यास सुमारे 35 कोटी अनिवार्य खर्च होत असल्याने महानगरपालिकेकडे निधी नसल्याने मोठ्या स्वरुपात देयके थकली आहेत. त्याचप्रमाणे कंत्राटदार यांना केलेल्या कामांची देयके प्रदान करणे आवश्यक आहे. यातुन आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मनपाकडे असलेल्या 122 कोटी रक्कमेच्या राखीव ठेवीच्या बदल्यात ओव्हर ड्राफ्ट घेतल्यास महापालिकेची थकीत विकास कामे सुरु होतील व अत्यावश्यक खर्च सुरळीत अदा करुन प्रलंबित देयके सुध्दा टप्प्याटप्प्याने देता येतील. शासनाकडून अनुदान व थकीत रक्कम प्राप्त झाल्यास टप्प्याटप्प्याने ओव्हरड्राफ्ट पध्दतीने घेतलेल्या रक्कमेत ती रक्कम वर्ग करण्यात यावी.

तरी मनपाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना व प्रक्रिया पाडण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच महापालिकेच्या काही कर्मचाऱ्यांनी कोविड कालावधीत चांगले काम केले आहे व राज्यपाल मा. श्री. भगतसिंग कोशियारी यांनी मा. आयुक्त - श्री. दिलीप ढोले यांचा सत्कारही केलेला असुन महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता देणे आवश्यक आहे. तरी मा. आयुक्तांनी इतर महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांना दिलेल्या कोविड भत्त्याची माहिती घेवून मा. महापौर व महापालिकेचे पदाधिकारी, गटनेते यांना विश्वासात घेवून महापालिका कर्मचाऱ्यांना 1 महिन्यांच्या आत कोविड भत्ता देण्यासही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्रीम. डिंम्पल मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५८, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सामान्य निधी तथा सन्मा. पदाधिकारी व नगरसेवक यांच्या निधीमधून सी.सी.टी.व्ही यंत्रणा कार्यान्वित करणेकामीच्या निविदांबाबत.

दिनेश जैन:-

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सिटी सर्व्हिलन्स सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) दि. २८/०१/२०२० रोजी उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समिती, गृह विभाग, महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली आहे. तथापि याकामी Request For Proposal (RFP) करणेस परवानगी दिलेली नाही. त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या पत्राचा पाठपुरावा करून मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार RFP प्रसिद्ध करणेकरीता परवानगी घेण्यात यावी.

तथापि शहरामध्ये वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलिस विभागाने शहरात सी.सी.टी.व्ही. प्रकल्प उभे करणे बाबत केलेल्या लेखी विनंती नुसार व सन्मा. पदाधिकारी व नगरसेवक यांच्या मागणीनुसार सन २०२०-२१ या कालावधीमध्ये मंजूर झालेली विविध ठिकाणच्या सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेबाबतच्या निविदा मंजुर कराव्यात व यापुढे लावण्यात येणाऱ्या सी.सी.टीव्ही यंत्रणा मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये नमुद केलेल्या तांत्रिक तपशिलानुसार (Technical Specification) लावणे आवश्यक असल्याने, सविस्तर प्रकल्प अहवालाच्या अनुषंगाने तांत्रिक तपशिलानुसार (Technical Specification) अंदाजपत्रक तयार करणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

हेतल परमार :-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण:-

सी.सी.टी.वी. गेल्या दोन वर्षापासून बंद आहे काहीना मंजूरी मिळाली होती परंतू कोविड काळात एक वर्ष झाल्यामूळे पून्हा परमिशन घ्यावी असे चालले आहे आता विषय आणला तर चांगले झाले. परंतू फक्त सी.सी.टी.वी लावणे हा विषय नसून त्याची देखभाल दूरूस्ती झाली पाहिजे कारण ठेकेदार एक किंवा दोन असतात आणि त्यांना पूर्ण शहराला बघणे शक्य नाही माझ्याकडचा कॅमेरा खराब झाला होता त्याची कम्पलेन्ट देवून दीढ दोन वर्ष झाली आहेत तरी ते झाले नाही त्या एरियात चो-या जास्त होत असतात अशा पध्दतीने होत असेल तर काही अटी शिथिल करा जेणेकरून दूसरे कॉन्ट्रयाक्टर भरू शकतील आणि ह्याच्यामध्ये एकावर भार पडणार नाही काही लोक ब्लॅकलिस्टेड झाली आहेत त्याच्यामूळे ते लावून गेले आहेत आणि ते परत आले नाहीत मग अशा वेळी त्याची दूरूस्ती आणि देखभाल कोण करणार ? जेव्हा गुन्हे घडतात त्यावेळी बघायला गेले तर त्याचा रेकॉर्ड आपल्याला मिळत नाही. मग सी.सी.टी.वी चा फायदा काय ? त्यामुळे तूमचे काही नियम असतील त्या शिथिल करा. जेणेकरून बाकीचे लोक त्यामध्ये समाविष्ट होवू शकतील त्या एरियानुसारच त्या कॉनट्रयाक्टरला काम दिली जावीत. प्रत्येक कॉनट्रयाक्टर सर्व काम मलाच मिळावी असे वागत असतात परंतू त्या नंतर काही काम केली जात नाहीत. हे मी स्वत: अनूभवलेले आहे. हयाची देखील दखल घ्यावी शहरात काही गून्हे घडले असतील आणि जर सी.सी.टी.वी बंद असतील तर त्या कॉनट्रयाक्टरवर गुन्हे दाखल करावे अशी माझी मागणी आणि सुचना आहे.

मा. महापौर:-

ठीक आहे.

राजीव मेहरा :-

मा. महापौर की परमिशन से मॅडम मैने पत्र लिखा था की डी पी आर मूझे कल मिला है पूरे मिरा भाईदर शहर का डी पी आर आया है इसका कॉस्ट १५० करोड हो रहा है मूझे यह पता करना है की पिछले १० साल में मनपाने सीसीटीवी पे खर्चा किया है और उसकी कन्डीशन क्या है मैने पाणपाट्टे साहबको एक फोटोग्राफ दिखाई मनस्वी मॅडम को एक फोटोग्राफ दिखाई शांतीनगरमें १२० कॅमेरा लगे है उनके पास एक टेबल स्पेस नही है जमिन पे बैठके वो लडका माऊस चलाता है एक महिना कन्टीन्हयू जाने के बाद वो लडका मूझे एक बार मिला हम बोलते है क्राईम रोखने के लिए सीसीटीवी मस्ट है लेकीन एक प्लानिंग होनी चाहिए कही पे भी कैसे भी लगा दिया जाये उससे काम नही होता है १७० करोड का ओपॅक्स और पॅकेप्स पकडके यह पाच साल का २०१७ में बनाया गया उस वक्त उसकी कॉस्ट २०० करोड के करीब होगी जहॉपे फोटो दिखाया वहा प्रभाग निधी से सीसीटीवी काम हूवा है लेकीन उसको इलेक्ट्रीकल कनेक्शन नही दिया और एकही कॉनट्रयाक्टर यह काम कर रहा है उसमे अटीशर्ती यह है की उसमें इलेक्ट्रीकल कॉनट्रयाक्टर चाहिए हम जब कूछ चिज मांगते है तो उसमें बोलते है की पुलिस परमिशन लगेगी और वह रेकॉर्डिग तीन महिने के बाद मिलती है अभी कमिशनर साहबने बोला की एफ डी तोडने की बात आ रही है तो १५० करोड का जो प्रोजेक्ट है और उसको पार्टसमें भी नही कर सकते यह कॉक्रीट रोड नही है की एक बना दिया दुसरा बना दिया ऐसा नही हो सकता जब तक हमारे पास पैसे नही है और टेक्नीकल स्पेसिफिकेशन नही होगे हमारे पास एक्सपर्टाईज नही होगे हमारे पास प्रोग्राम नही होगे तो ६ महिने में पूरा नेटवर्क गिर जायेगा मेयर मॅडम आपसे और कमिशनरसे रिक्वेस्ट है की कूछ भी करना है तो पूरी चीज का स्टडी करके डीपीआर के हिसाबसे और अब तक कितना खर्चा हूवा है वो यूज कर सकते है या उसको भी रिप्लेस करना है क्योकी वेस्ट ऑफ मनी होगा हर ६ महिने मे टेक्नॉलॉजी चेंज हो रही है अभी इन्होने

सीसीटीवी कॅमेरा लगाए है इलेक्ट्रीकल कॉनट्रयाक्टर है उसको काम दिया जा रहा है स्पेशलाईज जो लोग है उनको काम देना चाहिए पूरी सिटी की सिक्यूरिटी इसपे डिपेंड रहती है आपको यह चिज का ध्यान रखना है १५० करोड का प्रोजेक्ट है तो यह प्राव्हिजन होनी चाहिऐ अगर आपने २-२ करोड में काम किया तो यह काम होनेवाला नही है

मा. उपमहापौर:-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने जिस तरीकेसे मेहेरा साहबने बताया उन्होने शायदसे जो ठराव रखा गया है वो टेक्नीकल वजहसे वो बात उनके कानो तक पहूची नही जिस तरीकेसे उन्होने बताया है वो बात विस्तारसे ठराव में रखी गई है जैसे उन्होने कहॉ की २०१७-१८ में १५० करोड का था और अभी २०० करोड तक पहूच सकता है उस हिसाब से २-३ इश्यू रखे गए मेहेरा जी पूरी जानकारी लेते हूए जिस तरीकेसे ठराव होना चाहिए आनेवाले दिनो को देखते हूए आपने जो बताया टेक्नीकली तौर पे डे बाय डे बढोतरी हो रही है आज नया टेक्नोलॉजी आया है इसके लिए पूरी तरह से टेक्नीकल रूप से कैसे बैठ यकते है शहर के हित के लिए और १००% आप जानते है मिरा भाईदर के लिए यह टेक्नॉलॉजी होनी चाहिए सीसीटीवी से बहोत जादा निगरानी होती है हमारे शहरमे एक घटना अधिकारी के उपर घटी थी तभी सीसीटीवीसे ही अपराधी पकडे गए इसलिए ठराव के अंदर पूरी सविस्तर माहिती बताई गई है की आनेवाले दिनो के अंदर यह बताया गया है  की आनेवाले दिनो के अंदर डीपी आर के बारे मे और प्रपोजल क्या क्या स्पेसिफिकेशन लगनेवाली है इसके अंदर नगरसेवक हो या चाहे किसी प्रभाग की बात हो इन्डीव्हयूजवल खर्चा करने की बात है  कोई भी नगरसेवक यह नही कह सकता  की मूझे मेरे एरिया मे लगना है और में खर्चा कर सकता हूॅं  अगर वो करता भी है तो वो आजूबाजूके वॉर्ड है उसको क्रॅक कैसे करते है पूरा वो सायकलिंग कैसे बनता है उसको कनेक्ट करके आगे कैसे जा सकते है उसमे जानकारी लेके आगे बढेंगे दूसरी बात आयुक्त महोदयजीने फिक्स डिपॉझिट तोडने की बात की आयुक्त महोदयजीने किधर भी फिक्स डिपॉझिट तोडने की बात नही कही थी

राजीव मेहेरा :-

हम लोन लेने की बात कर रहे है लोन लेना पडता है आपने बोला था लोन लेना पडता है मेरा टेक्नीकल बात यह है की एक एक पट्टे का जो काम हूवा है मेरे लिए एक्झाम्पल यह है की आपने जो काम किया है उसको कितना खर्चा हूवा वो जानकारी दो

मा. उपमहापौर :-

हम शहर के हित के लिए ठराव रख रहे है उसमे एक माला में सबके यहॉ कैसे सीसीटीव्ही कॅमेरा आ सके सर्व्हीलंस एक जगह पे नही हो सकेगी उसका ध्यान रखके यह प्रोग्राम रखा गया है

मा. महापौर:-

उपायुक्तांनी खुलासा करावा कशा पध्दतीने सीसीटीव्ही कॅमेराचे मिरा भाईदरमध्ये वितरण करणार आहोत.

संदिन शिंदे :-

मा. महापौराच्या परवानगीने सीसीटीव्ही संदर्भात निवेदन करतो, सीसीटीव्ही संदर्भात काही सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले आहेत त्याप्रमाणे लेखी स्वरूपात आयुक्त महोदयाकडे दिले होते ह्या सर्व बाबीचा विचार करून पालिकेच्या हितासाठी आता पून्हा नव्याने हा विषय ठेवला आहे सन २०१६ ला एमएमआर मधल्या ज्या मनपा आहेत त्या सर्व मनपामध्ये सीसीटीवी संत्रणा राबवण्यासाठी शासन स्तरावरून कमिटी स्थापन केली होती त्याला आपण उच्च स्तरीय समिती म्हणतो  त्या समितीचे अध्यक्ष सचिव  उपसचिव हे प्रविण बाहये होते त्या कमिटीत मीसुध्दा सदस्य होतो. तेव्हा मी कल्याण डोबविलीला होतो.त्यवेळेस मे सहा. आयुक्त  म्हणून कार्यरत होतो. कल्याण डोंबिवलीचा प्रोजेक्ट आपल्यासोबत सूरू झाला पण त्यांचा ऑनलाईन चालू झाला कारण त्यांना स्मार्ट सिटीमधून पैसे

मिळाले आहेत याबाबत मला सभागृहाला डिटेलमध्ये सांगणे आवश्यक वाटते सूरूवातील आपण मुबई मनपाचा एक पार्ट असल्यामूळे आपली तशी मागणी तत्कालीन मा. आयुक्त महोदयांनी शासनाकडे केली होती की मुबई मनपाचा सीसीटीवीचा प्रोजेक्ट आहे त्याचाच एक पार्ट समजून आमच्या मनपाचासुध्दा प्रोजेक्ट पूर्ण करून देण्यात यावा. त्या अनुषंगाने २०१६ ला आपण पत्रव्यव्हार केला होता त्यानंतर १०/११/२०१६ ला शासनानी एमएमआर मधल्या मनपाच्या सीसीटीवी प्रोजेक्ट राबवण्यासाठी के पी एम जी ह्या संस्थेची सल्लागार म्हणून नियुक्ती केली होती त्यामुळे त्या उच्च स्तरीय समितीने त्या त्या महानगरपालिका आणि पोलिस विभाग ह्यांनी संयुक्तपणे पाहणी करून के पी एम जी कडे तो अहवाल द्यायचा आहे आणि के पी एम जी नी तो सविस्तर टेक्नीकल अभ्यास करून शासनाला सादर करायचा आहे असे निर्देश दिले होते. त्या अनुशंगाने आपले तत्कालीन ग्रामीण पोलिस आणि तत्कालिन मनपा आणि के पी एम जी नी तो डीपीआर तयार केला होता जसे मेहेरा साहेबांनी सांगितले जेव्हा सर्व्हेक्षण चालू होते त्यावेळेस अंदाजे आपल्यला १७६ कोटी खर्च येईल अश प्रकारचा तो प्रोजेक्ट तयार केला होता आणि तो डीपीआर शासनाला सादर केल्यानंतर त्या अनुशंगाने शासनानी वेळोवेळी उच्च स्तरीय मिटींग झाल्या त्यामध्ये के पी एम जी नी आपला डीपीआर राज्य शासनाकडे सादर केला. परंतू २०१७ नंतर याबाबतीमध्ये शासन स्तरावर मिरा भाईदर महानगरपालिकेच्या डी पी आर संदर्भामध्ये कूठल्याही हालचाली राबविल्या नाहीत दर्म्यानच्या काळामध्ये आपल्या शहरामध्ये वाढती गुन्हेगारी पार्श्वभूमी असेल त्याच्यानंतर आपले जे विविध सदस्य आहेत त्यांनी त्यांच्या प्रभागामध्ये सीसीटीवी बसविण्यासाठी जो त्यांचा निधी किंवा प्रभाग निधी असेल त्याबाबत पत्रव्यव्हार केल्यानंतर तत्कालीन महासभा आणि मा. आयुक्तांनी २०१९ मध्ये महासभेसमोर गोषवारा सादर केला होता की ह्या शहरामध्ये सीसीसटीवी प्रोजेक्ट राबवणे गरजेचे आहे. आर्थिक पार्श्चभूमी आणि शहराचे नगरीकरण ह्या सर्व बाबी विचारात घेवून आपल्या शहरामध्ये सीसीटीवी कार्यन्वीत करणे गरजेचे आहे त्यामुळे आपण महासभेत आलो होतो. आणि तत्कालीन महासभेने सुध्दा त्यावेळेस अंदाज धरून ९ कोटीच्या खर्चाला आपण मान्यता दिली होती आणि त्या मान्यतेच्या अनुशंगाने मधल्या दोन वर्षाच्या काळामध्ये सन्मा. सदस्याचे प्रभाग निधीचे जसजसे प्रस्ताव आले तसतसे प्राश्वभुमी विचारात घेवून राज्यशासनाने छोटे छोटे सीसीटीवीचे प्रस्ताव दिले होते आणि प्रभाग व्हाइज आपण काही काम केली होती दर्म्यानच्या काळामध्ये काही प्रस्ताव आल्यावर मी आयुक्त महोदयांशी चर्चा केली की प्रत्येक शहराचा डिपीआर शासन स्तरावर झाला होता आपला पण झाला असल्याची शक्यता आहे. आपण पडताळून पाहणे गरजेचे आहे. आणित्या अनुशंगोन भाविष्यात आपल्याला तो डीपीआरप्रमाणे जर मंजूर झाला तर शासन आपल्याला त्या डीपीआरचे पैसे देवू शकते आणि त्या अनुशंगाने पूर्ण फाईलची तपासणी केली असता आणि त्यातबाबत पत्रव्यव्हार केला असता अशी बाब निर्दशनास आली की आपला सुध्दा डीपीाआर दोन वर्षाच्य प्रक्रियेमध्ये चालू होतो आणि तो २०२० च्या उच्च स्तरीय समितीमध्ये १८/१/२०२० ची सथायी समितीची सभाा झाली होती त्यामध्ये पण चर्चा झाली आणि १२/२/२०२० ला तो मंजूर केला गेकला होता परंतू आपल्याला माहित आहे की त्यानंतर कोविडची परिस्थिती सूरू झाली आणि आपल्याकडून किंवा शासनाकडून त्या डीपीआर कोणतीच प्रक्रिया घेडली नव्हती आज हा प्रस्ताव हयासाठी आपल्यासमोर आला आहे की ४/६/२०२१ ला महासभेने पून्हा मंजूरी दिलेली आहे. त्यामध्ये पैशाचा उल्लेख केलेला नव्हता परंतू कशी अंमलबजावणी करावी त्याचे स्पष्टीकरण त्यावेळी आले नव्हते त्यामूळे हा डीपीआर प्रमाणे ह्या शहरामध्ये २०० कोटीचे कामकाज करायचे आहे त्यासाठी आपल्यापूढे विषय ठेवलेला आहे ह्याच्यामध्ये प्रशासनाचे दोन मुद्दे असे होते की आपण हाजो मंजूर झालेला डीपी आहे शासनाकडे रिक्वेस्ट ऑफ प्रपोजल करण्यासाठी मान्यमासाठी प्रयत्न करत आहोत भविष्यामध्ये आपला जर पस्ताव म्रंजूर झाला तर शासनाकडून निधी प्राप्त होणारआहेपरंतू सध्या कोविडची पार्शवभुमी आहे कोवडिच्या पाश्वभुमीवर छोटे छोटे प्रकल्प राबवत आहोत. हे जर आपण त्या डीपीआर प्रमाणे राबवले

नाहीत तर भविष्यामध्ये जो काही खर्च झाला आहे तो शासनाकडून मिळणार नाही. तो वगळून बाकीचा खर्च देऊ शकतील आणि अजून एक मेहेरा साहेबांनी सांगितले की ह्या टेक्नीकल स्पेसिफिकेशन प्रमाणे जर आपले काम झाले नाही तरदर २-३ वर्षानी ते कॅमेरे चेंज करायला लागेल म्हणून प्रशासनाच्या वतीने जो काही शासनानी आपला डीपीआर मंजूर केलेला आहे त्या डीपीआर प्रमाणे ह्या पूढे भविष्यामध्ये आपला जो प्रोजेक्ट आहे तो राबवण्यासाठी मान्यता मिळावी ह्यासाठी प्रपोजल आलेले आहे आपण शासन स्तरावर प्रयत्न करत आहोत की आमच्या डीपीआरला मान्यता मिळावी आणि तो निधी आम्हाला उपलब्ध व्हावा ह्याच्यामध्ये मनपाचे काही प्रोजेक्ट मंजूर झालेले आहे ठाणे मनपा तसेच कल्याण डोबिवली ह्या मनपाचे प्रोजेक्ट मंजूर झालेले आहेत आपण सुध्दा प्रयत्न करीत आहोत. माझी सभागृहाला विनंती आहे की हा डीपीआर मंजूर झालेला आहे त्याप्रमाणे ह्या प्रोजेक्ट करायला आपण मान्यता दिली तर भविष्यात कूठलीही त्रूटी येणार नाही आणि आता ज्या काही फाईल होत्या त्या आपण नविन डीपीआर प्रमाणे हया पूढे नविन स्पेसिफिकेशन घेवून मेहेरा साहेब जसे सांगताता तसे ए एम सी सह आपण प्रस्ताव करणार आहोत माझी सभागृहाला विनंती आहे प्रशासनाच्या वतीने गोषवारा ठेवला आहे. त्या मंजूर डीपी आर प्रमाणे कामकाज करण्यास मान्यता मिळावी.

मा. महापौर:-

उपायुक्त शिंदे साहेबांनी चांगला खुलासा केला आहे.

राजीव मेहेरा:-

शिंदे साहेब अभी तक जितना सीसीटीवी लगा हूवा है उसके लिए धन्यवाद करीब १०० करोड का है वो काम फायनल हो गया क्या ?

संदिप शिंदे:-

सन्मा. महापौर मॅडम ४/६/२०१९ महासभेने ९ कोटीला मान्यता दिली असली तरी ९ कोटी खर्च झाले नाहीत प्रभाग निधी किंवा नगरसेवक निधीमधून गेल्या दोन वर्षात १ कोटीपर्यंत खर्च झाले आहेत. मा. महापौर:-

एकच कोटी आतापर्यंत खर्च केले आहेत.

रूबिना शेख:-

मॅडम मूझे एक बात बोलना है सीसीटीवी कॅमेरा लगाने के लिए जो टेक्नीकल प्रॉब्लेम आते है सीसीटीवी कॅमेरा लगाके जाते है और वो चालू नही होते और कॉनट्र्याक्अर उसको नही देखता है पब्लिक भी उसका ध्यान नही रखती है में छोटासा सजेशन देना चाहूँगी अगर यह सीसीटीवी कॅमेरा का ॲक्सेस पुलिस स्टेशन में दिया जाये वो बहूत इफे्क्टिव होता है क्योकी पुलिस स्टेशन को उसकी निगरानी करनी है और कॉनट्रॅक्टरपे उसका दबाव रहता है जरासा भी प्रॉब्लेम रहता है तो उनको बुलाके कर लेते है रसाज थियटरमे मैने कॅमेरा लगवाए थे उसका ॲक्सेस पुलिस स्टेशन में दिया है और वो लोग टाईम टू टाईम उसकी जानकारी रखते है अगर सीसीटीची कापुलिस स्टेशन में ॲक्सेस दिया तो जादा इफेक्टीव रहेगा

जुबेर इनामदार:-

मा. महापौर मॅडम ह्या विषयावर माझी एक सुचना आहे ह्या शहरामध्ये जेव्हा सीसीटीवी बसवले जातील तर त्याचे वायरिंग किंवा केबलिंगची सुविधा करायला लागेल जेणेकरून गुन्हेगार पार्श्वभुमी राखणार लोक आपल्याला त्यांच्यावर नियंत्रण ठेवायचे आहे जेणेकरून नुकसान पोहोचवू शकणार नाही सर्वात जास्त वायर कापल्या जातात त्याच्यापूढे त्या यंत्रणा चालत नाही त्यामूळे ते प्रॉब्लेम होतात ह्याच्या आधी जे सीसीटीवी बसवले आहेत त्याच्या तांत्रिक बाबीवर विशेषत: लक्ष देण्यात यावे.

मा. आयुक्त:-

मा. महापौराच्या परवानगीने सन्मा. सदस्यांनी सुचना केल्या की पोलिस स्टेशनशी त्याचे कनेक्शन असावे आणि एक अंडरग्राऊड असावे आपल्या शहरातून ज्या ऑप्टिकल फायबर अंडरग्राऊड जातात त्या संदर्भात त्यांच्याशी एक बैठक आयोजित करून त्यांच्याकडून जास्तीत जास्त कन्सिशन किंवा मनपाच्या क्षेत्रातून ते काम करत असताना महापालिकेत काही आर्थिक सूट देता येईल किंवा मोफत घेता येईल का ही बाब तपासण्यात येईल आणि चांगली सुचना आहे की पोलिस स्टेशनच्या सोबत असतील तर मेन्टेनंस चांगला राहील आणि पोलिस स्टेशनला कंट्रोल रूम बसवता येईल किंवा ज्या ठिकाणी कंट्रोल रूम असेल त्या ठिकाणी पोलिसांचा पण आपल्या सोबत सहभाग असेल का ह्या बाबी तपासून परिपूर्ण असा डीपीआर बनल्यानंतर भविष्यात खर्चावर पण बचत होईल. सर्वाच्या ज्या सुचनाअहेत त्या शहरातील वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढत्या गुन्हेगारीवर प्रशासन योग्य ती कारवाई करेल.

मा. महापौर:-

मिरा भाईदर शहरातील वाढती गुन्हेगारी अपघात व विविध घटना ह्यावर मनपा प्रशासन तसेच पोलिस प्रशासन ह्यांचे नियोजन व नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे ह्याकरिता सीसीटीवी बसवणेकरिता ज्या सुचना व मागणी आहे त्याबाबत सन्मा. नगरसेवक तसेच प्रभाग समितीचे सदस्य ह्यांनी आपल्या पदरच्या माध्यमातून प्रशासनाला केलेली आहे आणि ह्याबाबत सन्मा. नगरसेवक दिनेश जैन ह्यांनी सभागृहात ठराव मांडलेला आहे हा ठराव सर्व सदस्यांनी ह्या ठिकाणी ज्या सुचना केलेल्या आहेत ह्यामध्ये सर्व नगरसेवकांच्या सुचनाचा विचार करण्यात यावा आणि सन्मा. नगरसेवक दिनेश जैन ह्यांनी मांडलेल्या ठरावामध्ये प्रशासनाने दुरूस्ती व देखभालीसह निविदा काढावी तसेच दिनेश जैन ह्यांनी मांडलेला ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. 58 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सामान्य निधी तथा सन्मा. पदाधिकारी व नगरसेवक यांच्या निधीमधून सी.सी.टी.व्ही यंत्रणा कार्यान्वित करणेकामीच्या निविदांबाबत.

ठराव क्र. 52 :-

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सिटी सर्व्हिलन्स सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) दि. २८/०१/२०२० रोजी उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समिती, गृह विभाग, महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली आहे. तथापि याकामी Request For Proposal (RFP) करणेस परवानगी दिलेली नाही. त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या पत्राचा पाठपुरावा करून मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार RFP प्रसिद्ध करणेकरीता परवानगी घेण्यात यावी.

तथापि शहरामध्ये वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलिस विभागाने शहरात सी.सी.टी.व्ही. प्रकल्प उभे करणे बाबत केलेल्या लेखी विनंती नुसार व सन्मा. पदाधिकारी व नगरसेवक यांच्या मागणीनुसार सन २०२०-२१ या कालावधीमध्ये मंजूर झालेली विविध ठिकाणच्या सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेबाबतच्या निविदा मंजुर कराव्यात व यापुढे लावण्यात येणाऱ्या सी.सी.टीव्ही यंत्रणा मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये नमुद केलेल्या तांत्रिक तपशिलानुसार (Technical Specification) लावणे आवश्यक असल्याने, सविस्तर प्रकल्प अहवालाच्या अनुषंगाने तांत्रिक तपशिलानुसार (Technical Specification) अंदाजपत्रक तयार करणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश जैन** **अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव:-

प्रकरण क्र ५९, मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सिस्टीम मॅनेजर (गट-अ) व लेखाधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत

धृवकिशोर पाटील:-

महापौर मॅडम पदोन्नतीचा विषय मिरा भाईदर महानगरपालिकेचा संपूर्ण महाराष्ट्रभर गाजलेला आहे. ह्या पदोन्नतीमुळे आमचे मित्र श्री. दिपक खांबित हे बचावले त्यांच्या कुटूंबियाची पूण्याई आमच्या सर्व मित्राच्या सुभेच्छा यांच्यामागे असल्यामुळे आज त्यांच्या केसालाही धक्का लागलेला नाही. मॅडम हीच जर पदोन्नती सर्वांची जर प्रशासनाने केली असती तर आज हा अपघात घडला असता का ? आणखीन किती वाट बघायची प्रशासनाने ? एखाद्या माणसाचा जीव घ्यायचा का ? आजा 2014 पासुन हा विषय प्रलंबित आहे आता 2021 ह्याला 7 वर्ष झाली 7 वर्षा पासुन प्रशासनाने हा विषय तडीस नेला नाही नसुता लोंबकत ठेवलेला आहे. आज आपले काही कर्मचारी त्याच पदावरती निवृत्त झाले त्यांना आता पदोन्नती भेटली असती आणि आज ते सन्मानाने त्या वरच्या पदावरती निवृत्त झाले असते. त्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले असते की मी त्या महापालिकेतुन त्या त्या पदावरुन रिटायर्ड झालो परंतु आज प्रशासनाचा गलथान कारभारामुळे आज पदोन्नतीचा विषय हा लटकला. आणि हा जर पुर्ण झाला नाही तर आजही आपले पालिकेचे असे अनेक अधिकारी आहेत की जे पदोन्नती नघेता सेवानिवृत्त होतील. महापौर मॅडम, आज आपल्या उपायुक्त पदावरती 50 टक्के महापालिकेचे कर्मचारी गेले पाहिजे आणि 50 टक्के प्रतिनियुक्तीवरती आले पाहिजे. 4 पदे उपायुक्ताची आहेत पण आज आपल्या महापालिकेत 5 उपायुक्त आहेत का मॅडम ? काय रिझन ? आपल्या लोकांना पदोन्नती द्यायची नाही आणि शासनाकडून आलेल्या उपायुक्तांना आपण हजर करुन घ्यायचे, कशा मुळे ? काय गरज आहे ? वर्षानुवर्ष ज्या कर्मचाऱ्यांनी आपल्या इथे काम केले ज्या अधिकाऱ्यांनी आपल्याकडे काम केले त्यांना आपण पदोन्नती द्यायची नाही, का रिझन काय आहे ? आज असे क्लास - 2 चे क्लास - 3 चे, क्लास - 4 चे असे अनेक कर्मचारी असे अनेक अधिकारी आज पदोन्नतीची वाट बघत आहेत चाका सारखे वाट बघत आहेत परंतु आजतगायात प्रशासनाने त्यांना पदोन्नती दिली नाही आणि हा विषय तसाच पेंडिंग ठेवलेला आहे. की आणखीन असाच कुठल्या तरी अधिकाऱ्यावर हल्ला व्हायची आपण वाट बघायची का ? आज महापालिकेची सेवा जेष्ठता यादी 2018 पासुन मॅडम प्रलंबित आहे त्याचा सुध्दा प्रशासनाने विचार केला नाही ती सुध्दा यादी मंजुर केली नाही आणि आपआपसामध्ये अधिकारी भांडत आहेत आणि ह्या भांडणाचा जर समजा काही चुकीचा ह्या लोकांनी अर्थ काढला किंवा कोणी सुसाईट जरी केले तर किती मागात पडेल मॅडम कशाला पेंडिंग ठेवायचे आहे ? मॅडम 2018 मध्ये महासभेमध्ये ठराव केला मुख्य फायर अधिकारी जे आहेत बोराडे यांना पदोन्नती देण्याचा पण आजतागयात महापालिकेने घेतलेल्या डिसिझनने सुध्दा अंमलबजावणी प्रशासनाने केलेली नाही. मग अशा रागामध्ये जे कृत्य जर कोण करेल त्याला जबाबदार कोण मॅडम ? आणि आज महापालिकेने प्रशासनाने फक्त दोनच अधिकाऱ्यांचा प्रस्ताव आणलेला आहे. माझे हे मत आहे मॅडम की आपण प्रशासनाला आदेश द्यायला पाहिजे की ज्या लोकांची सेवा जेष्ठता यादी प्रलंबित आहे ती यादी त्यांनी फायनल केली पाहिजे त्याच प्रमाणे ज्या अधिकाऱ्यांचे पदोन्नतीचे विषय पेंडिंग आहेत ते सुध्दा क्लियर केले पाहिजेत. काही लोक कोर्टात गेले, काही लोकांचा खर्च झाला परंतु आजतागयात प्रशासनाने केलेले नाही. माझे असे मत आहे मॅडम ह्या विषयावरती आयुक्ताने खुलासा केला पाहिजे आणि मी ठराव मांडत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महापालिकेच्या आकृतीबंधास शासनाने मान्यता दिली असून महापालिकेतील सुधारीत सेवा नियम (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) यांसही मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त आकृतीबंध व सुधारीत सेवा नियमाप्रमाणे पालिकेच्या अनेक वर्ग -2, 3 व 4 च्या अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती अद्याप दिलेली नाही. अनेक अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती न दिल्याने त्याच पदावर काही अधिकारी / कर्मचारी सेवा निवृत्त झाले आहेत व काही अधिकारी / कर्मचारी निवृत्त होण्याच्या मार्गावर आहेत.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांची संवर्ग निहाय ज्येष्ठता यादी सन 2018 पासून प्रलंबित आहे. 4 वर्षे होवूनही प्रशासनाने यादीस मान्यता दिलेली नाही.

महापालिकेच्या सेवा भरती व सेवा वर्गीकरणात उपायुक्त या पदावर प्रतिनियुक्तीवर 50% व महापालिका सेवेतील 50% अधिकाऱ्यांची पदोन्नतीने उपायुक्त पदावर नेमणूक करणे आवश्यक असतानाही प्रशासनाने शासनामार्फत उपायुक्त पदी प्रतिनियुक्तीने आलेल्या 50% पेक्षाही जास्त अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता प्रशासनाने महापालिकेतील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीचा व सेवा ज्येष्ठता यादी मंजुरीचा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीकरीता 1 महिन्यात सादर करावा. तसेच शासनामार्फत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीने आलेल्या अधिकाऱ्यांना 50% प्रमाणेच हजर करुन घ्यावे, उर्वरीत उपायुक्तांना शासनाच्या सेवेत वर्ग करण्यात यावे व महापालिकेच्या अधिकाऱ्यांमधुनच 50% पदोन्नतीने उपायुक्त या पदावर नियुक्ती करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

तसेच सिस्टीम मॅनेजर हे गट-अ संवर्गातील व लेखाधिकारी हे गट-ब संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे. त्यामुळे सिस्टीम मॅनेजर गट -अ व लेखाधिकारी गट-ब या पदावर दिलेल्या पदोन्नतीस तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अ.क्र.6 नुसार वर्ग-1 ची पदे पदोन्नतीने भरताना त्यास शासनाची पूर्वमंजुरी आवश्यक असल्यामुळे सिस्टीम मॅनेजर (गट-अ) या पदास शासन मान्यता मिळण्याच्या अधीन राहून सदर पदोन्नतीने नेमणूक करणेस मा. महासभा मंजुरी देत आहे.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, आपण आपल्या आणि मा. आयुक्त साहेब यांचा अध्यक्षतेखाली सगळ्या एच.ओ.डी. यांची बैठक मध्यांतरी ह्याच विषयावर आपली झाली होती. आणि त्यामध्ये देखील असाच निर्णय झाला होता का विलंब झाला याची देखील माहिती मा. आयुक्तांनी आपल्याला दिली होती तर त्यानुसार जी काही शिफारस आपल्याकडून करण्यात आली किंवा इतर एच.ओ.डी. यांचे देखील म्हणणे ऐकून घेण्यात आले त्यात गटनेते होते, विरोधी पक्षनेते होते आणि त्यानुसार जेवढे हे असतील तर त्यानुसार त्यांची पदोन्नतीची लिस्ट आपण एकत्रितच काढावी आणि एकत्रित काढून त्यांची लिस्ट जाहिर करावी अशी मी सुचना देत आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे. सन्मा. नगरसेविका प्रभात ताई पाटील बोला.

प्रभात पाटील :-

साहेब, एका मानसावर गोळीबार झाल्या नंतर आपल्याकडे हे दोन पदोन्नत्या झाल्या किती खेदाची बाब म्हणायची की आनंदाची म्हणायची मला माहित नाही पण ह्या पालिकेमध्ये पदोन्नत्या, माणसाची भरती, बढती, हा विषय ऐवढा गंभीर आहे आणि माझा माहिती नुसार आस्थापना विभागातली एकही फाईल कधी आयुक्तांकडे मान्यतेसाठी येते असे मला वाटत नाही. तो आस्थापना विभाग आयुक्त साहेब जरा याच्यामध्ये तुम्ही जातीने लक्ष घातले पाहिजे. कारण तिथे एवढ्या फाईली

पडून आहेत का करत नाही मला माहित नाही. मधल्या काळामध्ये मी महापौरांना एक पत्र दिले होते आणि त्या पत्राचा नेमका असा अर्थ लागला की त्या नगर रचना विभागामध्ये पदोन्नत्या द्याव्यात किंवा त्या नगर रचनाचा विचार व्हावा असे एक पत्र मी महापौरांना दिले आणि महापौर मला असे वाटल मी तुमच्याशी बोलले असतील किंवा मी पण तुमच्याशी बोलले आणि नेमका त्या नगर रचना विभागातुनच त्या बांधकाम विभागावर हे सगळ तुंभाट रचलं गेलं मला म्हणायचे एवढेच आहे की ह्या जर गोष्टी आपण वेळेत आणि वेळेवर केल्या बघा एक शिरवाळकरांची ऐक कविता आहे “मोडून गेला संसार पण मोडला नाही कणा पाठीवर हाथ ठेवून फक्त लढ म्हणा ” कधी कधी शाबास्कीची थाप सुध्दा खुम महत्वाची असते. आपण कोणत्या तरी पदोन्नत्या पदे त्यांना देवून त्यांचा हौसला वाढवत असतो त्यांचे धेर्य वाढवत असतो. तर ह्या सुध्दा गोष्टी पगारा इतक्या महत्वाच्या आहेत. माझे सांगण्याचे तात्पर्य फक्त एवढेच आहे की मी सभागृहाला सांगु इच्छीते की ह्या ज्या दोन पदोन्नत्या झाल्या आहेत खुप चांगले आहे तुमचे मणापासुन अभिनंदन जशा दोन पदोन्नत्या तुम्ही केल्या तशा अजुन अनेक खुप लोक तुमच्याकडे आशेने डोळे लावून बसलेले आहेत की आमचे पण कधी तरी पदोन्नत्या होतील. साहेब एक गोष्ट मी तुम्हाला अजुन सांगु इच्छीते आस्थापना विभागाचा कारभार, आपल्याकडे आजही 4-5 लोक त्या यादीत आहेत आणि महापौर मॅडम मी तुम्हाला सांगु इच्छीते की हे जे 4-5 लोक आहेत त्यांची केवळ हिंदी परिक्षा नाही आहे हिंदी भाषा विषय त्यांचा राहिलेला आहे म्हणून त्यांचा पदोन्नत्या राहिल्या आहेत. जर हिंदी भाषा आपल्याला पदोन्नतीसाठी कंम्पलशन आहे तर आस्थापना विभागाने त्यांना कळवायला नको का ? हे त्यांचे काम नाही का ? त्याच्यामुळे जर एखाद्याची पदोन्नती राहत असेल तर त्याला जबाबदार कोण ? मॅडम मी ह्या विषयावर बोलले कदाचित आयुक्त साहेबांना असे वाटेल की माझे कोण तरी तिथे आहे म्हणून मी त्या विषयी बोलते पण साहेब एक माणुसच नाही आहे केवळ हिंदी भाषा साठी आपल्याकडे 4 ते 5 लोक आहेत आणि ते लाईन मध्ये उभे आहेत. हरकत नाही त्यांच्यावर पण तुमचे लक्ष जाईलच तुम्ही त्याबाबतीत त्यांना आश्वासित केले आहे मला आनंद आहे त्या गोष्टीचा पण साहेब तुम्हाला विनंती आहे मी पुन्हा पुन्हा त्याच विषयावर येते की तुम्ही आस्थापना विभागावर आपले लक्ष जरा जास्त केंद्रीत करा कारण हा सगळा रोश त्यांच्याकडे नजाता तुमच्याकडे येतोय. तुम्ही ह्या पदोन्नत्या देत नाहीत किंवा तुम्ही त्या विषयावर तत्पर नाहीत असा सगळा रोश आहे किंवा आस्थापना विभागामध्ये सगळा ढांडोळा घ्या आणि सगळ्यांना सारखा न्याय द्या. आपल्या राज्यामध्ये आयुक्त ढोले साहेबांनी आमच्याकडे काणा डोळा केला किंवा आमच्याकडे दुर्लक्ष केला असे सध्या कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये जो घोळ आहे तो निघून जावा तुमची स्वच्छ प्रतिमा ह्या शहरामध्ये उजळ व्हावी. अनेक लोक आहेत त्यांची अशी शंका आहे की जेष्ठतर मी आहे पण माझाकडे कारभार नदेता आमच्या क्ष व्यक्तीला दिला. मॅडम म्हटलं माझ काही चुकल आम्हाला कळत नाही तर अशा सगळ्या गोष्टी ज्या आहेत किंवा तुम्ही स्व:त जातीने लक्ष देवून त्या निर्धारीत करा किंवा त्यातुन मार्ग काढावा अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

मा. महापौर :-

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सिस्टीम मॅनेजर व लेखाधिकारी या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबतचा ठराव सभागृहामध्ये मांडण्यात आलेला असुन याबाबत मी आपणास सांगु इच्छीते की  मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासना मार्फत मा. आयुक्त व उपायुक्त, गायकवाड साहेब ह्या दोघांनी अतिशय मेहनत घेवून प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना पदोन्नती देणे बाबत कामकाज श्री. दिपक खांबित यांच्यावर होणाऱ्या प्राणघातक हल्याचा आधिच सुरु केलेले होते. जुन महिन्या पासुन त्यांनी ह्या कामाला सतत गती दिलेली होती परंतु काही त्रुटी त्यामध्ये ज्या आढळून येत होत्या त्यातुळे त्यांना विलंब होत होता परंतु सर्व बाबी तपासुन कोणावरही अन्याय होणार नाही आणि जे पदोन्नतीचे हकदार आहेत त्यांना पदोन्नती मिळाली पाहिजे किंवा त्यांची बढती झाली पाहिजे ह्या बाबत दोघांनी चांगल्या पध्दतीने कामकाज केल्याचे मी स्व:त पाहिलेले आहे. जे

कित्तेक वर्षा पासुन प्रलंबित प्रस्ताव होता पदोन्नतीचा तो आज प्रशासनाच्या माध्यमातुन पुर्ण होण्याचा बेतात आहे याकरीता आजच्या सभागृहामध्ये मी मा. आयुक्त ह्यांना धंन्यवाद देते त्यांचे अभिनंदन करीन तसेच संबंधित विभागाने चांगले कामकाज करत असल्याचे मी पाहिले असल्यामुळे मी आज ह्या विषयाच्या माध्यमातुन की शहरामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका चालवत असताना ह्या शहरात राहणारे कित्तेक अधिकारी वर्ग तसेच शहरा बाहेरुन येणारे कित्तेक अधिकारी ह्या ठिकाणी कामकाज करत असतात आणि हे कामकाज करत असताना वर्षानुवर्ष मिरा भाईंदर शहराची सेवाही ते करत असतात अशा वेळेला जे अधिकारी पदोन्नतीचे हकदार आहेत त्यांची पदोन्नती ही झालीच पाहिजे आणि याबाबत आपण आस्थापनेवरील सिस्टीम मॅनेजर, व लेखाधिकारी ह्यांना ह्याठिकाणी पदोन्नती दिली आहे. सर्व मा. महासभा यांनी याला सर्वानुमते मंजुरी दिलेली आहे परंतु बाकिचे जे विषय प्रलंबित असतील त्यांनाही आपण लवकर गती द्यावी आणि इतर अधिका-यांना सुध्दा पदोन्नती येत्या डिसेंबर पर्यंत आपण द्याल अशी मी आपणा प्रशासनाकडून अपेक्षाही करते आणि आजच्या ह्या सभागृहामध्ये सन्मा. ध्रुवकिशोर पाटील यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला सर्वानुमते आपण मंजुरी देत आहोत असे मी घोषीत करते. अतिरिक्त आयुक्त, पानपट्टे साहेब यांना लसीकरणाच्या संदर्भामध्ये आपल्याशी काही बोलायचे आहे.

संभाजी पानपट्टे :-

मा. महापौर मॅडम व सर्व सदस्य यांचे स्वागत करतो, आपल्याला कोरोनाची तिसरी लाट जर थांबवायची असेल तर लसीकरणाचा वेग वाढवायचा आहे. आणि महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाने 31 ऑक्टोंबर पर्यंत 100 टक्के व्हॅक्सीनेशन करण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतलेली आहे. ह्या संदर्भात मोठी महानगरपालिकेने तयारी केलेली आहे. जवळ पास 35 ते 40 ठिकाणी आपण विशेष पथक निर्माण केलेली आहेत. आता पंडित भिमसेन जोशी, इंदिरा गांधी हॉस्पीटल, आप्पासाहेब धर्माधिकारी ह्या ठिकाणी सकाळी 8 ते संध्याकाळी 8 पर्यंत ती सेवा आपण उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच ज्याठिकाणी आपले प्रायमरी हेल्थ सेंटर आहेत 16 ठिकाणी त्या 10 ते 4 ठिकाणी आपण व्हॅक्सीनेशनची सोय करुन ठेवलेली आहे. प्रायव्हेट हॉस्पीटलला सुध्दा व्हॅक्सीनेशन करण्यासाठी सुध्दा जवळ पास 8 प्रायव्हेट हॉस्पीटलला सुध्दा व्हॅक्सीनेशनची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे. हाऊस टू हाऊस सर्व्हे आपण सुरु केलेला आहे. आरोग्य विभागामार्फत जवळ पास 443 टीम आम्ही तयार केलेल्या आहेत. हाऊस टू हाऊस प्रत्येक घरात जावून प्रत्येकाचे लसीकरण झालेले आहे की नाही त्या संदर्भात आम्ही सर्व्हे केलेला आहे. आणि तसेच वेगवेगळे आस्थापना आहेत त्यासाठी पालक अधिकारी नेमून त्याठिकाणी आम्ही सर्व्हे करुन 100 टक्के लसीकरण 31 ऑक्टोबरच्या पुर्व कसे होईल आम्ही त्या पध्दतीने प्रयत्न करत आहोत. तरी पण सुध्दा पाहिजे तसा प्रतिसाद आपल्या सगळ्या नागरीकांकडून मिळत नाही. आजही सुध्दा जवळ पास 5 ते 6 हजारच व्हॅक्सीन होते आणि जवळ पास आपल्याला पहिला डोस घेवून जवळ पास 72 टक्के लोकांनी घेतले आहे जवळ पास 28 टक्के लोक अजुन व्हॅक्सीनेशन करायचे राहिले आहेत. दुसरा डोस बघितल्यास जवळ पास फक्त 39 टक्के लोकांचे झालेले आहे अजुन सुध्दा 61 टक्के लोकांचे दुसरा डोस सुध्दा झालेला नाही. त्यामुळे आम्ही वेगवेगळ्या पध्दतीने प्रयत्न करुन सुध्दा पाहिजे त्या प्रमाणात लोकांना जनजागृती झालेली दिसुन येत नाही. आपल्या माध्यमातुन सुध्दा जर आपण केली आपले पदाधिकारी असतील, नोंटीस बोर्ड असतील अशा लोकांना त्यांना जनजागृती करुन आपले जवळ पास 35 ते 40 ठिकाणी जे लसीकरण केंद्र आहेत त्याठिकाणी त्यांनी जावून लसीकरण घेणे बाबत त्यांना प्रवृतत करावे. आपण सर्व सोसायटींना पत्र दिलेले आहे जर सोसायटीमध्ये व्हॅक्सीनेशन झालेले नसेल त्यांना प्रवेश देवू नका, पेट्रोल पंम्पाला पत्र दिलेले आहे, रेशनिंगलाही पत्र दिलेले आहे जर व्हॅक्सीनेशन झाले नसेल तर त्यांना रेशन देवू नका, पेट्रोल देवू नका, आपल्या परिवहन बसेसमध्ये सुध्दा सांगितलेले आहे जर त्याचे व्हॅक्सीनेशन झाले नसेल तर त्याला प्रवेश देवू नका. अशा वेगवेगळ्या पध्दतीने आपण लोकांना प्रवृत्त करतोय तरी

सुध्दा पाहिजे त्या प्रमाणात प्रतिसाद मिळत नाही. आपल्या स्थरावर मी सगळ्यांना विनंती करतो आपल्या पदाधिकाऱ्यांमार्फत आपले काही वेगवेगळे माध्यम असतील सोशियल मेडिया असेल, त्या माध्यमातुन सुध्दा आपण लोकांना प्रवृत्त करुन 31 ऑक्टोंबर पर्यंत 100 टक्के लसीकरण कसे होईल या दृष्ट्रीकोनातुन आपण मदत कराल अशी मी आपणाला विनंती करतो. धंन्यवाद.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, आपण ह्या ठरावा बद्दल आपणही तिकडून स्पष्टीकरण दिलेले आहे परंतु मला मा. आयुक्तांना पण विनंती करायची आहे याच्यामध्ये एक विषय असा आहे जो ध्रुवकिशोर पाटलांनी जो ठराव केला त्यामध्ये आयुक्त महोदय 50 टक्के जे उपायुक्तची पदे आपली आहेत महापालिकेतली तर तो कोटा आपण पुर्ण करावा ही आमची आपणाला विनंती राहिल. आणि दुसरं आयुक्त महोदय अशी खंत आहे की महापालिकेचा एक चांगला कारभार चालु आहे किंबहूना कोविड-19 याच्यामध्ये आपणही चांगल्या प्रकारे सगळ्यांनी कामे केलेली आहेत काही वेळेला प्रत्येक वेळेला आपल्या निदर्शनास आणुन दिलेले आहे आयुकत महोदय की येथे पदाधिकाऱ्यांना कुठल्याही कार्यक्रमाची सुचना किंवा कुठल्याही कार्यक्रमाची कल्पना दिली जात नाही. आजही आम्ही महापालिकेत असताना उपमहापौर असो किंवा मी स्व:त असो किंवा विरोधी पक्षनेते असतील, गटनेते असतील, कुठल्याही पदाधिकाऱ्याला त्याठिकाणी आजही अॅब्युलंसचे उत्घाटन झाले महापौर मॅडम त्याठिकाणी आम्हाला बोलविण्यात आलेले नाही किंबहूना एखादा फोन जरी केला असता तरी आम्ही त्याठिकाणी आलो असतो परंतु तो केला नाही याच्या अगोदरही नगरभवन मध्ये जे कार्यक्रम झाले आयुक्त महोदय त्या कार्यक्रमाला देखील आम्हाला कुठली पत्रिका नाही किंवा आम्हाला फोन द्वारे कळविण्यात आलेले नाही तर माझी विनंती राहील महापौर मॅडम, आयुक्त महोदय आपणाला की वेळोवेळी जे जे कार्यक्रम महापालिके मार्फत घेण्यात येतील त्या त्या वेळेला पदाधिकारी जे आहेत त्यांना कृपया आपण बोलवावे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य सभागृहनेते यांनी जी सुचना मांडलेली आहे याची प्रशासनाने त्वरीत दखल घ्यावी कारण सर्व सन्मा. सदस्य त्याठिकाणी आमंत्रीत करणे फार गरजेचे आहे विरोधी पक्षनेता, सभागृहनेता, स्थायी समिती सभापती, महिला बालकल्याण समितीच्या सभापती, जे कोणी पदावरती आहेत त्या सर्वांना तिथे आमंत्रित करणे गरजेचे आहे. प्रशासनाकडून ही चुक दुसऱ्यांदा झालेली आहे परंतु यापुढे अशी चुक होणार नाही याची दखल मा. आयुक्त आपण तसे आदेश सर्व प्रशासनाच्या संबंधित विभागाला काढावेत. ज्याच्या ज्याच्या कार्यक्रम असेल त्यांनी सर्वांना कळवावे असे मी ह्या ठिकाणी सांगते. आणि दिपावलीचा सण हा लवकरच समोर येणार आहे त्यामुळे सर्वाना दिवाळी सणाचा मी हार्दिक शुभेच्छा देते. दिपावलीच्या ह्या शुभक्षणी आपल्या सर्वांना सुख संमृध्दीची जावो आणि आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये शांततामयी वातावरणामध्ये दिवाळीचा सण साजरा होवो आपणा सर्वांना पुन्हा एकदा मंगलमय दिवाळीचा हार्दिक शुभेच्छा आणि ह्या सणाचा निमित्ताने मिरा भाईंदर शहर हे कोरोना मुक्त व्हावे सर्वांनी लसीकरणाचा लाभ आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये देण्याचा प्रयत्न आपण नगरसेवकांच्या माध्यमातुन करावा ही अपेक्षा सुध्दा मी आजच्या दिनी आपणा सर्वांकडून करते.

प्रकरण क्र. 59 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सिस्टीम मॅनेजर (गट-अ) व लेखाधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत

ठराव क्र. 53 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महापालिकेच्या आकृतीबंधास शासनाने मान्यता दिली असून महापालिकेतील सुधारीत सेवा नियम (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) यांसही मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त आकृतीबंध व सुधारीत सेवा नियमाप्रमाणे पालिकेच्या अनेक वर्ग -2, 3 व 4 च्या अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती अद्याप दिलेली नाही. अनेक अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती न दिल्याने त्याच पदावर काही अधिकारी / कर्मचारी सेवा निवृत्त झाले आहेत व काही अधिकारी / कर्मचारी निवृत्त होण्याच्या मार्गावर आहेत.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांची संवर्ग निहाय ज्येष्ठता यादी सन 2018 पासून प्रलंबित आहे. 4 वर्षे होवूनही प्रशासनाने यादीस मान्यता दिलेली नाही.

महापालिकेच्या सेवा भरती व सेवा वर्गीकरणात उपायुक्त या पदावर प्रतिनियुक्तीवर 50% व महापालिका सेवेतील 50% अधिकाऱ्यांची पदोन्नतीने उपायुक्त पदावर नेमणूक करणे आवश्यक असतानाही प्रशासनाने शासनामार्फत उपायुक्त पदी प्रतिनियुक्तीने आलेल्या 50% पेक्षाही जास्त अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता प्रशासनाने महापालिकेतील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीचा व सेवा ज्येष्ठता यादी मंजुरीचा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीकरीता 1 महिन्यात सादर करावा. तसेच शासनामार्फत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीने आलेल्या अधिकाऱ्यांना 50% प्रमाणेच हजर करुन घ्यावे, उर्वरीत उपायुक्तांना शासनाच्या सेवेत वर्ग करण्यात यावे व महापालिकेच्या अधिकाऱ्यांमधुनच 50% पदोन्नतीने उपायुक्त या पदावर नियुक्ती करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

तसेच सिस्टीम मॅनेजर हे गट-अ संवर्गातील व लेखाधिकारी हे गट-ब संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे. त्यामुळे सिस्टीम मॅनेजर गट -अ व लेखाधिकारी गट-ब या पदावर दिलेल्या पदोन्नतीस तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अ.क्र.6 नुसार वर्ग-1 ची पदे पदोन्नतीने भरताना त्यास शासनाची पूर्वमंजुरी आवश्यक असल्यामुळे सिस्टीम मॅनेजर (गट-अ) या पदास शासन मान्यता मिळण्याच्या अधीन राहून सदर पदोन्नतीने नेमणूक करणेस मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशारे पाटील अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रशांत दळवी :-

नगरसचिव विभागातील लिपीक श्री. कैलास दामोदर म्हात्रे यांचे वडील कै. दामोदर भाऊ म्हात्रे यांचे दि. 18/09/2021 रोजी निधन झाले त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

दु:खवठा ठराव क्र. 54 :-

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते. धंन्यवाद.

(सभा संपण्याची वेळ सायं. 4.00 वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका